—: प्रेसनोट :—

दि. ३१/०३/२०२१

यातील फिर्यादी हे बांधकाम कंत्राटदार असुन त्यांनी म्हाडा अंतर्गत असलेल्या इमारत दुरुस्ती बांधकाम केलेल्या थकीत बिलाची रक्कम मंजुर करण्याकरीता यातील आरोपी लोकसेवकाने फिर्यादीकडे रु.१,००,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी करुन रु. १,००,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | **२०/२०२१** |
| **कलम** | **७ भ्र.प्र. अधिनियम १९८८** |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | राजकुमार हणमंत वरुडे, वय ५३ वर्षे शाखा अभियंता, ( वर्ग २) — मुंबई इमारत व दुरुस्ती पुर्नरचना मंडळ, कुलाबा, संक्रमण शिबीर, साधु वासवाणी रोड, कफ परेड मुंबई ०५ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/— |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | **रु. १,००,०००/—** |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे मुंबई इमारत व पुर्नरचना मंडळा अख्यारीत येणाऱ्या इमारत दुरुस्तीचे व इतर किरकोळ दुरुस्तीची कामे करतात. फिर्यादी यांना सन २०१९—२० मध्ये 'ए' वार्डातील एकुण ३६ दुरुस्तीची कामे मिळाली होती. सदरची कामे फिर्यादी यांनी पुर्ण केली असुन सदर कामांचे एकूण बिल रु.२२,६०,०००/— इतके होते. त्यापैकी रु.५,००,०००/— इतके बिल मंजुर करण्यात आले असुन उर्वरीत बिलांची रक्कम मंजुर करण्याकरीता यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादीकडे रु.१,००,०००/— लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादीस आरोपीत लोकसेवकास लाच दयावयाची नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. १६/०२/२०२१ रोजी प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>दि.१६/०२/२०२१ व दि.३०/०३/२०२१ रोजी फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता यातील आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांचे थकीत बिल मंजुर करण्याकरीता रु. १,००,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन आज दि. ३१/०३/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवकाने रु.१,००,०००/— लाचेची रक्कम फिर्यादीकडून स्विकारताना आलेसे यांस रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणुन गुन्हा नोंद. |

अपर पोलीस उप-आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते बृहन्मुंबई

३१/०३/२१

( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००